


# आयुष्य शोधतो मी

- सुहास बाविस्कर

# आयुष्य शोधतो मी

सुहास बाविस्कर

सुभाषित प्रकाशन

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

**आयुष्य शोधतो मी**
**(मराठी कविता)**

Aayushya Shodhato Mi
(Marathi Poetry)

प्रथमावृत्ती : १२ ऑक्टोबर २०१३.

© सौ. मंगला सुहास बाविस्कर
'आसरा', प्रसादनगर,
सत्यम पॅलेसमागे, दिंडोरी रोड, नाशिक-४.
mansuba1966@gmail.com

**मुखपृष्ठ**
कॅनव्हर, नाशिक
(९८५०९९६१५७)

**प्रकाशक :**
सुभाषित प्रकाशन
हंसध्वनी ब, विसे मळा, कॉलेज रोड, नाशिक
संपर्क : ९८८१२४८४२९.
subhashitprakashan@gmail.com

**मुद्रणस्थळ :**
मुद्रणकला, नाशिक

**अक्षर जुळणी :**
विजयकुमार इंगळे (८८८८९७८५७)

**मूल्य : ८० रुपये**

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

ज्यांनी खऱ्या अर्थाने
मला वाढवले, घडवले
ती माझी आजी व आजोबा
स्व.ति. राधाबाई व स्व.ति. किसनशेठ बाविस्कर
व त्यांचाच वसा घेतलेली
माझी थोरली बहीण
सौ. शकुंतला अशोक मेटकर
यांना आदरपूर्वक अर्पण...

– सुहास बाविस्कर

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मनातलं काही :

'संवेदनशील मनाचे स्पंदन म्हणजे कविता' असे मला वाटते. माझी आजी स्व.ति. राधाबाई किसनशेठ बाविस्कर ही अतिशय प्रेमळ व संवेदनशील अशी होती. माझे बालपण खेड्यात म्हणजे धुळे जिल्ह्यातील बेटावद येथे गेले. खेडेगाव असले तरी तेथे पिठाच्या गिरण्या होत्या. तथापि कडधान्यांच्या डाळी माझी आजी स्वतःच जात्यावर घरी दळत असे. ती जात्यावर बसली म्हणजे मी तिच्या मांडीवर डोके ठेवून पेंगत असे. त्यावेळी मी चार पाच वर्षांचा असेल. पण आजी जात्यावर बसताच तिच्या कंठातून लयबद्ध स्वरचित ओव्या बाहेर पडत असत. त्या ओव्यांमध्ये संसारील सुख-दुःखे असायची तसेच घरातील लहान-थोरांची नावे ओवून त्यांची स्तुती असलेल्या ओव्या ती म्हणत असे. मला वाटते तेथेच कळत-नकळत माझी कवितेशी नाळ जोडली गेली असावी.

माझे वडील स्व. ति. विश्वनाथ किसनशेठ बाविस्कर हे संस्कृतचे व्यासंगी व अभ्यासक होते. माझे वडील व माझे दोन-तीन काका एकत्र बसून  अतिशय मधूर स्वरात देवी सप्तशती, शिवरूद्र, गीता, स्त्रीसुक्त, पुरुषसुक्त, विष्णूसहस्त्रनाम आदी म्हणत असत. नंतर त्यातील काही भाग ऐकून ऐकून माझाही मुखोद्गत झाला व त्यातही मला रस वाटू लागला. या निमित्ताने अशा महाकाव्यांशी माझी थोडीबहुत तोंडओळख झाली.

माझे शिक्षण एस.एस.सी.पर्यंत झाल्यानंतर पुढे काही प्रापंचिक अडचणींमुळे मला शिक्षण घेता आले नाही. तथापि मला मुळातच वाचनाची अत्यंत आवड होती. नोकरीनिमित्त नाशिकसारख्या तीर्थक्षेत्री व कविवर्य तात्यासाहेब तथा कुसुमाग्रज यांच्या साहित्यभूमीत आल्यावर साहित्यापासून दूर राहणे मला शक्यच झाले नाही. त्या काळात माझे वाचनही बऱ्यापैकी झाले. तात्यासाहेब तथा कविवर्य कुसुमाग्रज, सुरेश भट, मंगेश पाडगावकर, ग्रेस, मर्ढेकर, बहिणाबाई आदी कवींचे काव्यसंग्रह मी आवर्जून वाचले. मला नाटकांमध्ये खूपच रस असल्याने वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, अनिल बर्वे यांची नाटके मी अभ्यासली. त्यातील पु. ल. देशपांडेंच्या 'तुझे आहे तुजपाशी' व अनिल बर्वे यांच्या 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही माझी अत्यंत आवडती नाटके.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

सन १९८९-९० मध्ये मी पाटबंधारे संशोधन विभागातील सांस्कृतिक मंडळाचा सचिव असताना माझी पहिलीच कविता आदरणीय तात्यासाहेब शिरवाडकर तथा कुसुमाग्रज प्रणीत कवी गोविंद काव्यपुरस्कारासाठी निवडली गेली. तसेच माझी पहिलीच लिहिलेली कथा ही त्याच वर्षी आदरणीय डॉ. अ. वा. वर्टी पुरस्कारासाठी निवडली गेली. त्यानंतर मराठी ॲकॅडमी, बडोदा यांचा कथा पुरस्कार व गोमंतक कथा पुरस्कारही मला मिळाले. तसेच माझे साहित्य 'साप्ताहिक लोकप्रभा', 'सकाळ', 'गांवकरी' तसेच दिवाळी अंकांमध्येही प्रकाशित झाले. परंतु मध्यंतरीच्या काळात लिखाणात कसा नि काय, परंतु खंड पडला, हे मात्र खरे.

माझ्या सहकारी कवयित्री सौ. जयश्री अनिल वाघ यांच्या निमित्ताने माझे स्नेही कवी विवेक उगलमुगले यांच्याशी परिचय झाला. गप्पांच्या ओघात माझे लेखन त्यांनी वाचले व माझा सतत पाठपुरावा करून मला लिहिण्यास प्रोत्साहित केले. मी ज्या काही कवी, लेखकांच्या सहवासात आलो त्यांना स्वतःच्या साहित्याविषयी सार्थ अभिमान पाहिला व तो असावाही. पण माझे स्नेही कवी विवेक उगलमुगले हे साहित्यिक तर जन्मजात आहेतच, तथापि दुसऱ्यांना लेखनास प्रोत्साहित करण्याच्या त्यांच्या स्वभावाने मी भारावलो. अनेक कवी, लेखक निश्चितच त्यांच्या प्रोत्साहनाने प्रकाशात आले आहेत. ते एक साहित्यिक असण्यापेक्षा एक संवेदनशील माणूस आहेत, हे मला प्रकर्षाने जाणवले. सदर काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचा योग केवळ कवी विवेक उगलमुगले यांच्या स्नेहाचे फलित आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानून त्यांच्या ऋणातून मुक्त होणे मला खचितच आवडणार नाही.

सदर काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा माझा मानस माझी पत्नी सौ. मंगला सुहास बाविस्कर, माझी मुलगी सौ. श्वेता हेमंत देवरे, माझा मुलगा चि. राम सुहास बाविस्कर तसेच माझा लाडका नातू चि. ज्ञानेश हेमंत देवरे या सर्वांना याबाबत कळाल्यावर त्यांनाही खूप वर्षांपासून ज्या गोष्टीची प्रतीक्षा होती, त्याची पूर्तता झाल्याचा त्यांना आनंद झाला. माझा कवितासंग्रह प्रकाशित व्हावा! असे सर्वप्रथम सूतोवाच करणारे माझे व्याही श्री. पंढरीनाथ कृष्णाजी देवरे, जावई श्री. हेमंत पंढरीनाथ देवरे यांचीही इच्छा या निमित्ताने पूर्ण होत असल्याचा त्यांना तसेच मलाही आनंद आहे.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

साहित्यनिर्मितीत संघर्षमय जीवनाबरोबरच स्थिर चित्तवृत्तीचीही आवश्यकता असते. उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिकचे मुख्य अभियंता मा. श्री. भा. चं. कुंजीरसाहेब यांच्या कार्यकाळातील पोषक वातावरणामुळेच सदर काव्यसंग्रह प्रसिद्धीस बळ मिळाले आहे. त्यांचे ऋण शब्दांपलिकडचे आहे. त्यामुळे मी त्यांच्या ऋणानुबंधात राहणेच पसंत करतो.

माझे मित्र श्री. अतुल नामदेव पवार जरी साहित्य क्षेत्रात नसले तरीही चांगल्या कामांना सतत प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या स्वभावाचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. या निमित्ताने मी वरील सर्वांचे तसेच कवयित्री सौ. जयश्री अनिल वाघ, ज्या त्यांच्या नकळत माझ्या साहित्याच्या समीक्षकाचीही भूमिका निभावतात आणि माझे मित्र व साहित्य रसिक श्री. कृष्णा दे. चौरे व इतरही अनेक मित्र व माझे हितचिंतक ज्यांचा नामोल्लेख अनावधानाने नमूद करण्याचे राहून गेले असेल त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

कथासंग्रह किंवा काव्यसंग्रह प्रसिद्ध करणे सध्याच्या काळात जोखमीचे आहे, ही जोखीम तरुण, होतकरू, उत्साही कवी 'सुभाषित प्रकाशन'चे प्रकाशक श्री. सुभाष सबनीस यांनी स्वीकारली, त्याबद्दल त्यांचे कौतुक व आभार तसेच सुबक मुखपृष्ठ तयार करणाऱ्या कॅनव्हर यांचेही आभार. या सर्वांच्या ऋणाचा ठेवा कायम बाळगण्यातच धन्यता वाटत राहणार आहे.

या काव्यसंग्रहातील जवळपास निम्म्या कविता या १९९० साली लिहिल्या आहेत व उर्वरित कविता या आताच म्हणजे जुलै, ऑगस्ट २०१३ मध्ये लिहून कवितासंग्रह प्रकाशित करीत आहे. सदर काव्यसंग्रहाबाबतचे अभिप्राय रसिक वाचकांकडून जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. रसिक व जाणकारांचा अभिप्राय हाच या काव्यसंग्रहाच्या यशापयशाचा व माझ्या साहित्यिक वाटचालीचा आधारस्तंभ आहे, असे मी मानतो. या काव्यसंग्रहाचे सर्व रसिक वाचक सुयोग्य स्वागत करतील व माझ्या या लेखनकृतीला दाद देतील अशी आशा आहे.

रसिक वाचकांच्या प्रतिक्रिया माझ्या दृष्टीने अनमोलच!

**– सुहास बाविस्कर**

**(९२२५१४५१७०)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अंतरंग


१ आता जगून घेतो ........................................
२ रक्त ........................................
३ नाते ........................................
४ माणूसधर्म ........................................
५ आई ........................................
६ पहिला आठव ........................................
७ जीवन स्वप्न ........................................
८ खूण ओळखीची ........................................
९ आयुष्य शोधतो मी ........................................
१० तू... ........................................
११ पाऊस ........................................
१२ माय–बाप ........................................
१३ अस्वस्थसे काही... ........................................
१४ हाय कंबक्त! तू प्यालाच नाहीस! ........................................
१५ युगाची आई ........................................
१६ काळी नजर ........................................
१७ पराभव ........................................
१८ कशाला हव्यात... ........................................
१९ नि:ष्पर्ण ........................................
२० प्राजक्त ........................................
२१ निशा ........................................
२२ आता तरी ........................................
२३ दॅटस् इट! ........................................
२४ अनामिका ........................................
२५ नॉ टू बी ........................................




e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

२६ चिमणगाणे ..........................................
२७ शोध सुखाचा ..........................................
२८ की म्हणावे... ..........................................
२९ हलके फुलके ..........................................
३० मागणं ..........................................
३१ हळहळ ..........................................
३२ कोण ती ..........................................
३३ प्रवास ..........................................
३४ सागरा ..........................................
३५ बेईमान ..........................................
३६ माझा हिशेब न्यारा ..........................................
३७ महानिर्वाण ..........................................
३८ सीमारेखा ..........................................
३९ रानफूल ..........................................
४० विरह ..........................................
४१ अस्तित्त्व ..........................................
४२ इशारा ..........................................
४३ सवाष्ण ..........................................
४४ पतन ..........................................
४५ वेध ..........................................
४६ जोगवा ..........................................
४७ दिवा ..........................................
४८ काव्यप्रभा ..........................................
४९ कविता ..........................................
५० आजी – एक आत्मिय अपरिहार्यता ..............................
५१ मानिनी ..........................................



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आता जगून घेतो

झेलून घाव सारे, पाषाण मी ही होतो
नाही क्षती कशाची, आता जगून घेतो.

केल्या मी गुन्ह्यांचा, भरला तुम्हीच प्याला,
रिचवून त्या विषाला, आता जगून घेतो.

द्युतात जरीही तुमचा, हा डाव शकुनीचा,
धिक्कारुनी कटाला, आता जगून घेतो.

अंगार शब्द माझे, नाहीत चंद्र तारे,
वाटून स्वप्न सारे, आता जगून घेतो.

होतो अजाण पक्षी, तुमची गिधाड टोळी
जाणून सत्य ते ही, आता जगून घेतो.

भोगून सर्व झाले, सौदे खुशीत तुमच्या
आयुष्य भणंग माझे, आता जगून घेतो.

उधळून जीवनाला, ही भिक्षुकी कशाला?
कैफात आज माझ्या, आता जगून घेतो.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# रक्त

म्या तुला दावतो रगत कसं आसतं,
औषदाबिगर मेलेल्या पोरावानी आसतं
म्या तुला दावतो रगत कसं आसतं,
कंची कमाई नसलेल्या इधवेवानी आसतं
म्या तुला दावतो रगत कसं आसतं,
पैका गाठी नसलेल्या म्हाताऱ्यावानी आसतं
म्या तुला दावतो रगत कसं आसतं,
समद्यांसाठी झटून यकटा पडलेल्या बाप्यावानी आसतं
म्या तुला दावतो रगत कसं आसतं,
चलाखीनं जगलेल्या शान्या कावळ्यावानी आसतं
म्या तुला दावतो 'रगत लाल नसतं',
घाव घालून गेलेल्या शब्दावानी आसतं.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## नाते

प्रत्येक किरण येथे शापित सावल्यांनी
प्रत्येक आस असते बंदिस्त वेदनांनी

कित्येकही महात्मे झटले सुखास आमुच्या
कित्येक आज डोळा दिसते तरीही पाणी

कित्येक आत्म्यांना दो घास ना सुखाचे
कित्येक कुबेरांची ती वेगळी कहाणी

कित्येक सात्विकांना ना लाभलीच शांती
मस्तीत धुंद फिरती किती दुराभिमानी

ओकित रक्त जगले कित्येक जीवनाला
आयुष्य दो घडीचे ना पाहिले कित्येकांनी

ही भिन्नता जरीही दिसतेच आज डोळा
प्रत्येक किरण आहे शापित सावल्यांनी

अंधारल्या मनांना ना साथ सावल्यांची
आहेच प्रकाशाला वरीलेच सावल्यांनी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## माणूसधर्म

वर्णू क्षणास कुठल्या, साराच बे हिशेबी
सौदाच या सुखाचा, करता न मला आला.

झेलून वार सारे, झालो जरी विफल मी
बाजार भावनांचा, करता न मला आला.

मस्तीत सर्व होते, बेहोष ज्या क्षणीही
अंधार या मनांचा, विसरता न मला आला.

माळा स्तुतिसुमनांच्या, घालून शत्रूलाही
पाठीत वार त्यांच्या, करता न मला आला..

पाहून थेर सारे, आली जरीही ग्लानी,
या फाटल्या शिडांना, पर्याय ना मिळाला.

देवूच सर्व केले, मजला जरी तुम्हीही,
माणूसधर्म माझा, विसरता न मला आला..



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आई

पोर आली गर्भवासी, ल्याली लावण्याचे लेणे
पोटी जगताचा भार, ओठी सदाच हसणे
कशी माया तुझी पोरी, तुझ्या आईचे तू रूप
कसे म्हणावे मी तुला, मला घे गं तू ओटीत.
मी गं बाप झालो तुझा, नाही माया काळच मी
कशी गावी मी गं पोरी, तुझ्या ऐश्वर्याची गाणी
नाही बोललो कधी मी, चार बोल गोडाईचे
परि दिसते गं डोळा, भाव तुझे विठाईचे
काय पोर काय माय, जग नात्यांचा बाजार
कसे सांगू तुला पोरी, माझ्या आसवांचा भार
डोळे भरता तरीही, मी गं झालो दगडाचा
सुख पाहून तुझे गं, देव पावला मनाचा
दगडाचा बाप तुझा, नाही माया त्याच्यापाशी
तो मी दिधला गं पोरी, वसा तुझ्या आईपाशी
काही दुःख आज नाही, घर भरून हे वाही
कळी फुलो गं तुझीही, रडता तू बाळा पाही
तुझं काळीज फाटता, मी गं भावभोर होई
दुःख माझे पांगविण्या, तूच होई माझी आई...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# पहिला आठव

तुझे आठव
माहेर गाव
जपून पहिला
ऋतुस्त्राव

मी शोधात
रात्र अमोल
भरती मला
तू अबोल

अशी कोठे
थांबतेस राणी
आठवू नकोस
माहेर गाणी

गर्भ तुझ्या
ओटीपोटात
शोध ऋतूस्त्रावाचा
थांबलाय त्यात

बोल आता
जाणार कुठे
हलकेच कळी
तुझी फुलते



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# जीवन स्वप्न

दारी मंगल तोरण, नांदे रांगोळी अंगणी
शिण जातो जगताचा, सुख आभाळ भरोनी
काय देई वीत-गोत, नाही पैशांचीही मात
तवा भाकरी नांदते, सुखे मिरची संगत
घर खोपटे जरीही, भिंती पोतारल्या माती
कैसा सुगंधही त्याचा, ज्याची मातीशीच नाती
नाही लखलख दिवा, परि तेवते पणती
सूर्यप्रकाशाचे तेज, मन समुद्र भरती
कैसा भोग कोण देव, मन मोतियांची रास
तण निंदता मातीचे, देव फिरे आसपास



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# खूण ओळखीची

मी निर्मोही भणंग फकिर
तू निग्रही स्थितप्रज्ञ स्थिर
नाव माझी शीड फाटलेली
तू होवून गल्बत थांबलेली
मी केवळ एक वादळ
तू वटवृक्ष, मूळ घट्ट रोवून बसलेली
मला थांबणे माहीत नाही
चतूर तू, मैलाचा दगड, आसावलेली
मी अनोळखी माझ्याच साठी
तुझ्या डोळ्यात खूण ओळखीची



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आयुष्य शोधतो मी

काळोख सोबतीला, मृत्यू समोर आहे
वैराण सांजवेळी, आयुष्य शोधतो मी.

अंधारल्या दिव्यांना, वातीत तेल नाही
त्या शुष्क आत्म्यांचे, आयुष्य शोधतो मी.

मैफलिस ज्यांच्या, रात्री अपार गर्दी
काजाळल्या दिसांचे, आयुष्य शोधतो मी.

उन्मत्त श्वापदांनी, केला शरीर सौदा
उरल्यात भावनांचे, आयुष्य शोधतो मी.

गाथा पराक्रमाच्या, गाऊन धन्य झाले
बंदिस्त वेदनेचे, आयुष्य शोधतो मी.

जगले जगाच साठी, जगण्यात परी मेले
अदृश्य शाश्वताचे, आयुष्य शोधतो मी.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## तू...

मी बेभान सैरभैर
खणखण नोटा मनभर
वैर
जिणे माझे खरे-खोटे
स्वप्नात माझ्या घालते
खेटे
नोट माझी चलन बाद
चमेलीनेही फिरविली
पाठ
फिरून आलो घर-खोपटे
नजर तुझी फूल-
रोपटे
चुरचूर डोळे खोलच खोल
माळून गजरा तू
अबोल
मिटता डोळे आला पूर
वाहत गेली दूरच
दूर.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## पाऊस

★ पाऊस-
तुझ्या रंध्रारंध्रांतून
माझ्या रोमारोमात
...   ...  ...
हिरवागार.
-०००-

★ मी कोसळू नये म्हणून
कोसळतो तुझा पाऊस
................
जगतो मी तुझा पाऊस
-०००-



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

★ पाऊस-
नदी, नाल्यांना
पूर आलेला

.................
ओंजळीतून माझ्या
तुझ्यात विसावलेला.
-०००-

★ मी अहंकारी
दगड होवून सोसतो घणाचे घाव

.................
बळ देतो, तुझा पाऊस
-०००-

★ तू माझ्यात
मी तुझ्यात
भिजतोय दोघे
एकाच पावसात

.................
चिंब होवून
-०००-

★ पाऊस आषाढघन-
वेंधळा...

.................
बिलगून राहिलेला.
-०००-



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

★ तुझा पाऊस
भरून जातो
................
माझे रितेपण
-०००-

★ पाऊस-
मेघमल्हार तुझ्या डोळ्यात
................
मी मान्य करतो
माझा पराभव
-०००-

★ तू गोंदवून
वीज कपाळावर
   पाऊस ठि
          ब
          क
          तो
................
अस्वस्थ... उदास...
-०००-



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## माय बाप

पाऊस शेतात
रान हिरवेगार
पांघरून शेला
धरतीचा साज

नदी नाले
खळखळ त्यांची
धरतीचा शृंगार
कानात सांगती



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

तरुणाईत धरती
पाऊस बेभान
सरींवर सरी
नाही त्याला भान

नदीलाही पूर
धरतीचा नूर
कुशीत तिच्या
गावे-गुरे भेसूर

प्राणांतिक टाहो
माणसांचा गाजे
काळ्या काळ्या नभात
भयानता जागे

धरणी-पाऊस
जग हतबल
आई धरती
वात्सल्याचे बल

बाप पाऊस
होई कनवाळू
सूर्याचे काळीज
दिसे हळुहळू



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अस्वस्थसे काही...

❍ तो जगला आणि मेलाही अन्नान्न दशेत
त्याच्या तेराव्याला चुकता केला त्यांनी
त्याच्या पंचपक्वान्नांचा हिशेब
माणूस बुडला तरी चालेल,
पण त्यांनी धर्म बुडविला नाही.

-०००-

❍ इतके सोपे नसते राव
उद्ध्वस्त होवून उभे राहणे
मेलेले कोंबडे आगीला भीत नाही म्हणतो मी
....        ....        ....
आणि लढतो बिनदिक्कत.

-०००-

❍ विनंती अर्ज करून काम होत नसेल तर
म्हणा - 'मारीन' लाथ आणि काढीन पाणी
आणि चला पुढे तेवढ्याच धाडसाने
विजयश्री माळ घालेल तुम्हालाच.

-०००-



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

○ पराभवानेही झुकावे त्यापुढे असे काहीसे
मरणातही जगला जो थोडे, थोडेसे
मरूनही उरला जो मनामनात
असे मरण यावे तोडून जीवनाचे पाश.

○ मी शब्दवेल्हाळ... आकाशपक्षी
तुमच्याच मनात साक्ष त्याची
मी हताश तुमचे दुःख पाहून
तुम्ही निराश तुमचेच दुःख झेलून
फरक इतकाच
तुमचे वैभव स्वप्न माझे
घरकुल नसता वसतो तेथे

-०००-

○ त्यांचे जडते घडते तेव्हा- मी निःशब्द
त्यांची तक्रार - हा का बोलत नाही
ते लढतात, झगडतात तेव्हा
माझे बोलणे सरळसोट म्हणून
मी थांबतो, थबकतो
................
तरीही त्यांची तक्रार - मी का बोलत नाही.

-०००-

○ कविता काय लिहिता राव
भळभळते रक्त, ऊसासे, अल्लड प्रेम, पागलपणा
मंजूर मला
पण हे सांगतानाही तुम्हीच ऐकत असता चवीने
................
................ 'रसिक बलमा...'



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

❍ गाथा पराक्रमाच्या त्याच्या
तुम्ही वाचाव्यात किती?
त्यातील शब्दही अवघड
त्यातही अडखळता किती

❍ त्याच्या कपाळावर सटवीनं
तसंच लिहिलंय
असं तुम्ही म्हणता
.............
कळते काय त्यातले तुम्हाला?
............. कप्पाळ!

-०००-

❍ खडा टाकला पाण्यात म्हणजे तरंग उठणारच
तरी तुम्हाला वाटते, टाकून बघावा खडा
पण नितळगार पाणीच ते
त्याचाही रंग जोखण्याची तुमची अथांग प्रतिभा
................
तेव्हा मी हसतो मनोमन.

-०००-

❍ सर्व असून काहीच नाही
असे ज्याला वाटते
तोच प्रगतीशील
सरण (इतिश्री) आणि मरण सारखेच दोन्ही

-०००-



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# हाय कंबख्त, तू प्यालाच नाहीस!

वंचनेचे दुःख आहे
विवंचनेत त्याच मी
शोधितो मी दुःख आहे
भरून सुखाचा प्याला कुणी

ऐसेच जीवन माझे, दुःख दारिद्र्य वंचना
निर्भत्सून मी स्वतःला, मारल्या जगून भावना.

तत्वार्थ माझ्या जीवनाचा, ना शोधिला मी कधी
जगण्यात माझ्या कैफ होता, आणि नशाही जन्मही.

मी नशेबाज झालो, केली नशा जीवनाची
जीव जगवून जगलो, जगविले कित्येकही.

अनोळखी मी झालो तरीही, निर्भत्सना माझीच आहे
निर्भत्सनेत त्याच मी, झिंगून जगलो आज ही.

झिंगण्याचा कैफ होता, नाही कधीही थांबणे
संपण्याचा सूर नाही, रोज संपून नवे जिणे.

अंधार माझा कोंडला मी, रात्रीच शांत झोपुनि
दिवसाचा प्रत्येक प्याला, रिचविला रात्रीच मी.

शोधितो मी दोस्त आहे, 'कम्बख्त पिनेवाला' कुणी
सोबती माझ्या सवे, 'झिंगलेला' असा कुणी.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# युगाची आई

आत आत
खोल खोल.
साहे मन
वेदना अबोल.

खाली वर
लाही लाही
होतो जीव
नाही नवलाई

रग अंगी
मन वेडे
मन झुला
रे वाटते कोडे

गर्भ तिचा
ओला ओला
कोर्डा घसा
जीव जगलेला.

हे हृदय
जळतेय काही
युगांयुगे
साहतेय आई



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## काळी नजर

ओले किच्च केस तुझे
उनाड पसरून कोवळ्या उन्हात.
काळी काळी माझी नजर
काळे मन, काळे विचार.

सांग कोठवर भिरभिर डोळे
शोधात तुझे कोठे कशास?
रुतले पाऊल चाल माझी
शोधते आयुष्य घनदाट केसात.

शोधू नकोस स्पर्श माझा
फितूर वारा होईल पसार
मन तुझे कोठे काही
उनाड वारा उडवेल त्यास.

या ऋतुंचे कणीस ओले
दाणे स्तनावर तू रोवलेले.
वाऱ्यावरच्या कणसात राणी
ऋतूस्त्रावाचे वेध थांबलेले.

हलकेच ऊसणं ओटी पोटात
दुखरे हसू तुझे ओठात.
साहून भार कोवळा कोवळा
फुलून अबोली देठ देहात.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## पराभव

अद्यापही का अडकावेत माझे श्वास
तुझ्या श्वासात.
अद्यापही का यावीत तुझ्या गावची पाखरे
माझ्याच अंगणात.
अद्यापही का घुमावा तुझा मृदुंग
माझ्या मंदिरात.
हे सारे संपवायलाच हवे!
फुफ्फुसातील श्वासाला गोठवायलाच हवे
पण हाय...
तोही बेईमान-
फुफ्फुसात रक्त असते तर गोठवले असते
नात्यासारखे
किंवा बदललेही असते-
आडनावासारखे.
पण श्वास बदलायचे म्हणजे
बदलावे लागेल जीवनच!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# कशाला हव्यात...

कुणी कुणाच्या ऊरी श्वास पेरावे
कशाला खुळ्याने उगा शीणवावे
किती रत्न इथले मातीत गेले
किती श्वापदांचे जिणे धन्य झाले
असा न्याय इथला चिरंजीव होई
कशाला हव्या या मला मोजदादी

अरे याज्ञिकांनो तुम्हीच आग लावा
इथे पुण्य ओले उभे आहुतीला
भले भूवरी भव्य लावा पताका
स्वर्गावरी तरी देवू नका धडाका
किती झोपड्यांचे पुण्य आले फळाशी
कशाला हव्या या मला मोजदादी

कर्ण बा तुझा रे जन्म व्यर्थचि गेला
तुझा जन्मही मातेस भार झाला
तुतारी फुंका ना दुंदुभे पांडवांची
चिरःशांतीत तुझिया मिरवणूक त्यांची
असा बंधूभाव इथला शाश्वतचि राही
कशाला हव्या या मला मोजदादी.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# निष्पर्ण

आता पानगळ
छाताडाशी हाडे
कोणीच बापडे
साथी नाही.

दुभंगे जमीन
सावली हाडांची
बिंब प्रतिबिंब
म्हणू कोणा.

तोडण्या लचके
उभे ठेकेदार
पुकारीत वार
लिलावाचा.

ऐशा मोसमाच्या
गोष्टी दारोदार
पानांचे आभार
धन्य पक्षी.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## प्राजक्त

जपलेल्या कोवळ्या भावनांचा आविष्कार
एक प्राजक्त
दरवळत्या सुगंधाचा सहवास
एक प्राजक्त
क्षणिक असून चिरंतन स्मरणात
एक प्राजक्त
वर्षावावर वर्षावाचा प्रवास
एक प्राजक्त
मातीला फुलांचा हव्यास
एक प्राजक्त
कोमेजणाऱ्या हृदयांची रास
एक प्राजक्त
कर्णासारखे काही खास
एक प्राजक्त
सात्विकांचा जसा ऱ्हास
एक प्राजक्त
शिणलेल्या चांदण्यांचा निःश्वास
एक प्राजक्त
क्षणभंगूर जीवनावर विश्वास
एक प्राजक्त!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# निशा

आठव स्वप्नांचे, वेशीत वाऱ्याचे
गोंदण कोरीत ये
आसक्त डोळ्यात, बुब्बुळ डोहात
तारका पेरीत ये.

तृषार्त मनांचे, विझल्या वातीचे
दीपही तेवीत ये
घामाच्या देहात, अश्वात, मृगात
तृष्णेला ताडीत ये.

काळोख मनात, साजण डोळ्यांत
एकांत माळीत ये
अवखळ नदीत, काठात ओठात
संगीत ढाळीत ये.

चंद्राळ स्तनात, मदन देहात
तृप्तीच्या ग्लानीत ये
उत्सुक कळ्यांचे, आतूर पिलांचे
पारणे फेडीत ये.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आता तरी

मी माझ्या मुलास म्हणालो,
आता तू मोठा झालास
थोडं बदलायला हवे तूला
तसा तो स्तब्ध झाला
चेहऱ्यावर थोडा पोक्तपणा आणला
मुद्राही केली थोडी गंभीर
मी पाहतच राहिलो
म्हटलं, 'हे काय नवीन?'
तसा तो मला समजावणीच्या सुरात म्हणाला,
'पप्पा, मोठा झालो म्हणून काय झाले?
मोठा झालो म्हणून बदलायला हवे
असा कायदा आहे काय?'
वाटलं, आता तरी आपण सावध व्हायला हवे
काहीतरी बदल करायला हवे।



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## दॅटस् इट!

माझी मुलगी श्वेता
तिला पाहायला मुलाचे वडील
व मुलगा आला होता.
चहा पाणी झाले-
मुलाच्या वडिलांनी मुलीस
जन्मतारीख, शिक्षण, आवड वगैरे विचारले.
नावड विचारली नाही.
मुलाच्या वडिलांनी मुलीला
'स्वयंपाक वगैरे येतो काय?'
असे विचारता मी मध्येच म्हणालो-
अहो, स्वयंपाक काय विचारता?
'तिखट मीठाचे हिचे अंदाज इतके जहाल आहेत की,
बघता बघता भर पंक्तीला कुरुक्षेत्राची कळा येते.'
लगेचच मुलाचे वडील म्हणाले,
'दॅटस् इट! मुलगी पसंत आहे'
त्यांना थांबवत मी म्हणालो,
अहो, 'हे वाक्य कानेटकरांचं'
ते म्हणाले, आम्हाला मुलगी पसंत आहे
आणि बँड वाजला.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अनामिका

हो धुंद चंदनाची, बरसात तिने केली
स्वप्नात साज अपुला, दावून आज गेली

निष्पर्ण वृक्ष होता, ओकित सूर्य आग
ग्रीष्मातल्या मनाला, फुलवून आज गेली

काळोख सोबतीला नव्हती कुठेच वाट
डोळ्यात विश्व अपुल्या दावून आज गेली

उद्ध्वस्त जीवनाला नव्हता कुठे किनारा
जगण्यास अर्थ आगळा देवून आज गेली

नाहीच दिल्या शपथा, वचने न आणाभाका
शब्दास गंध देण्या, आली पुन्हा न गेली.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# नॉट टू बी

पापण्यांच्या कडांमध्ये भरून आलेले ढग
कोसळू द्यायचे नसतात अवेळी
आपल्याच फुललेल्या प्राजक्तावर

झाडांना जाणीव असते ऋतुंची

कातरवेळी छेडू नये आर्त सतार
ऊमलत्या निशिगंधासमोर
आणि मांडू नये हिशेब प्राक्तनचा

दुपारचे ऊन सोसले असते त्यानेही

ऊडून गेलेल्या पाखरासाठी
बांधू नये जाळे पारध्याचे
आणि करू नये प्रतारणा निरागस प्रेमाशी.

ग्रीष्मातही आयुष्य बाग बहरते स्मृतीतून.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# चिमणगाणे

चिवचिव चिमणी
गाते गाणी
भरते कोण
कणसात दाणी.

काळे काळे आभाळ
लख लख वीज
ढगात पाणी
आणलेय कुणी?

हिरवे हिरवे पान
दवबिंदू छान
फुलात सुगंध
येतो कोठून सांग.

खोल खोल दरी
ऊंच ऊंच झोका
चांदोबा आकाशात
राहतो कसा?

पक्षांची आई
दूर दूर जाई
वाट कशी कळते तिला
सांग ना गं आई.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# शोध सुखाचा

दुःख दुःख ते करावे आणि दुःख जागवावे
येता आसू कैसे हासू, नाही सुखा हरवावे
दुःख लोचनी साठले, नद्या समुद्र आटले
काय जगण्याचे मोल, मन, आयुष्य बाटले
दुःख नाही आधार तो, नसे त्याला पारावार
ज्योती समई तेवून, जसे अंधारा जपावे
जगी जगण्याचे जिणे, जग जगविता जाणे
जग जागवित जगी, जगी मना जागवावे
कोण कर्म, काय नीती, कशी मांडावी संगती
जिथे वेदही थकले, अशी कर्माची ती गती
काम करताना काम, काम कामची ते राहो
नको विचारांच्या लाटा, नच लेखा दृष्टी पाहो
काय करून कराल, झाले गेले आठवता
आहे दुःखाची ती कळ, कसा सांगावा धाडता
नाही दुःख आळवावे, सुख शोधून पाहावे
येई मनास मोहोर, सुख शोधता जाणावे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# की म्हणावे...

कोंडल्या श्वासात माझ्या कोंडला देहांत आहे
मरण कैसे कोण ठावे, की शिडीचा साप आहे

कोण हा संसार येथे या दिव्याने मांडलेला
वात होई या नसांची, आणि रक्तचि जाळताहे

ऊसवत्या वेदनांना दोन्ही करांनी झाकू किती?
तिरडीच या वेदनांची, निघावी प्रतीक्षा फक्त आहे

ही विदेही रात्र कैसी, तारकांचा नाच हा
चंद्रमौळी पापभोळा, फासून अंगी राख आहे

सत्य नाही हे ही तैसे, जीवनाचा भास हा
की म्हणावे याला परीक्षा, फास की अभ्यास आहे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## हलके फुलके

जीवनाचे दास आम्ही, भोगण्या भोग जन्मलो
भोगुनि भोगीच ठरलो, भोगून ऐसे पावलो.

काय माथ्यावरीच आहे, कलंक आम्हा लागलेला
रमासवे रमताच आम्ही, जनी 'सद्कीर्तीस' पावलो

कीर्तनाचे वेड येता, चित्ती आमुच्याही असे विठाई
का वेडावून बोलता, देवपूजेस लागलो.

लांछनाचे जगणे कसे हे, लांछन कपाळी घेऊनि
सोडून पायरी जगाची, आम्ही कधी ना वागलो

म्हणू नये कृष्ण कैसा, कि लिलाही दांभिकता
दोन्ही घरचा पाहुणा ऊपाशी, करण्यास लीला सरसावलो

म्हणू नका वैराग्य कैसे, बाणिले आम्ही असे
कृष्ण लीला सहस्त्रसोळा, कर्मयोगी व्हावे कसे?



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मागणं

हे कविते-
तुझ्या शब्दांतून कधी, मी पेटविल्या दीपमाला,
तर असू दे त्यात तेज
आमावस्येचा, अपप्रवृत्तींचा अंधार दूर करण्याचं.

कधी केलेच तुझ्या ओळींनी अभ्यंगस्नान
तर ते असावं-
कंठस्नान घातल्यानंतरचं
खदखदून हसणाऱ्या राक्षसी प्रवृत्तीला!

अत्तराचा सुगंध कधी दरवळलाच माझ्या शब्दातून
तर तो असावा विजय-
निखळ सत्याचा.

जर हे शक्यच नसेल तुला तर-
माझा प्रत्येक शब्द होवू दे मशाल
आणि खेळू दे मला होळी फक्त
हीन, अधम, लाचार, नाकर्तेपणाची भावना
जाळून टाकण्याची-

यापेक्षा अधिक काहीही देवू नकोस मला
दे फक्त मला हे आणि हेच!!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## हळहळ

भिकेचा कटोरा हातात घेवून
जेव्हा ते माझ्या दारात उभे होते
तेव्हा कणव वाटायची त्यांची
त्यांच्या परिस्थितीची आणि हतबलतेचीही.

कटोऱ्यात चार दोन पैसे मिळताच-
ते निघून जात मुकाट्याने.
असे अनेक कटोरे व चेहरे भेटले.

मी देखील झालो आकर्षित कटोऱ्याकडे
आणि कटोरा घेवून पहिल्या दारात उभा राहून हाक दिली-
'माय या कटोऱ्यात मला तुझे दोन आसू दे!',
माय म्हणाली, पोरा, असा भिकारी पहिल्यांदाच भेटला
आणि भरभरून ओकले तिने तिचे दुःख
तिच्या विटलेल्या पातळासारखे
आणि हलके केले तिने तिचे मन.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

नंतर, पुढच्या दारात हाक दिली-
'भाऊ, या कटोऱ्यात मला तुझे दोन आसू दे!'
तोदेखील चकित झाला
म्हणाला, काय सांगू? संसार, बायका-पोरं, घर-दार...
सारे दुःख त्याने कटोऱ्यात रिते केले!

संध्याकाळी घरी आलो. समोर बायको-
ती जाणून होती लोकांसाठी माझे तडफडणारे मन.
म्हणून शांत नेहमीप्रमाणे.
रात्री केव्हातरी-
तिचे दोन उष्ण थेंब माझ्या हातावर पडले
म्हणाली, 'आणा तुमचा कटोरा.....'



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## कोण ती

लागला शांतीत कधी डोळा
अशी रात्र नसे कोणती
घेतला श्वास कधी मोकळा
अशी ही प्रीत कशी कोण ती

समोरी लाख दीपमाळा
तरीही जपून एक पणती
मनाचा खेळ कसा हा खुळा
खेळते खेळ अशी कोण ती

काळ हा मेघ असा काळा
स्पर्शतो दिशा कधी कोणती
हरनिशी नेत्र वाही खळखळा
अहोदिन नशा जिची कोण ती

झेलुनि ऊरी नवनव्या कळा
मनाशी चैन नसे कोणती
वसंती ग्रीष्माचा तळतळा
तुझी ही रित असे कोणती?



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## प्रवास

तो आपल्याला छळतो
याचा तिला मनस्वी राग!
त्याने आपल्याला छळावे
असेही तिला वाटते
नाही छळला तर-
ती तडफडते, दुःखी होते.
आणि छळलं तर-
उगाचच आपले सूर-
तक्रारीचे लावते
तो जाणून असतो तिचा नूर
आणि प्रवास
.......................
.... त्याचा नुसता नुसता छळ!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## सागरा

आपल्या सहस्त्रबाहुंनी
वर्षानुवर्षे कुरवाळत आहेस तू धरतीला
साद घालीत.

पूर्ण चंद्राला पाहून
तुझ्या प्रेमालाही येते भरती
आणि देहभाव विसरून तू देखील
करू पाहतोस प्रलय.

पण आपल्या सीमा तुझ्या ध्यानी येताच
सावरतोस स्वतःला
आपल्या परिघात नेवून.

पुरुषोत्तमा -
हीच तुझी ओळख आणि
खूण अगाध सामर्थ्याची
तसेच अमरत्वाचीही
तुझ्या आणि धरणीच्या.

■



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# बेईमान

इतका मी बेईमान गणतीच नसे त्याला
प्रत्येक शब्द माझा का बेईमान झाला.

आयुष्य हे तयांचे मस्तीत झोकण्याचे
माझ्याच हाती प्याला का बेईमान झाला.

ओठी सदा तयांच्या असतात वेद गीता
माझ्याच ओठी शब्द का बेईमान आला.

दिमतीसही तयांच्या बंगले आणिक गाड्या
अंतरी सदैव टोचे बेईमान शब्द मजला.

रांगा खुशामदांच्या भोवती सदैव त्यांच्या
माझ्याच वाटणीला हा बेईमान आला.

हा दोष नसे माझा असलाच प्रकृतीचा
समजेच ना तरीही बेईमान या मनाला.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# माझा हिशेब न्यारा

चित्तात माझियाही ज्योती अनेक होत्या
विझवून सर्व गेला, तुमचा उनाड वारा.

स्वप्नात चांदण्यांची मी पाहिली वरात
लाभू न दिला तुम्ही, परि एकही न तारा.

उघडी सदैव दारे, माझ्याच भावनांची
बंदिस्त होत तुमची, येता पिसाट वारा.

तुमच्या जरी यशाचा असला सदैव मारा
माझ्याच भावनांचा मज धन्य हा पसारा.

वैराण नाव माझी, जरी दूर तो किनारा
चिंता कशास आता? माझा हिशेब न्यारा.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# महानिर्वाण

सूर्य डोक्यावर घेवून नाचण्याचा अभिशाप
आपल्याच माथी का यावा
या विचाराने
झाडे गलितगात्र होत नसतात कधी
की नसतात शोधत सावलीचा कवडसा.

काळ्याकुट्ट ढगातून वीज चमकली
नव्हे कोसळली अंगावर
तरी बिचारे असतात स्थितप्रज्ञ
जमिनीवर पाय घट्ट रोवून.

प्रलयंकारी वेदनांच्या वादळातही
झाडे वाकत नसतात कधी
परिस्थितीपुढे नतमस्तक होवून.
आणि झुंज देत काळाशी
जेव्हा झोकून देतात स्वतःला समरांगणात-
तेव्हा धरतीलाही अवघड होते
लपवणं छाताडावरचा खोल घाव.

आणि इथंच रोवला जातो प्रारब्धाच्या पराभवावर
महानिर्वाणाचा झेंडा!


e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## सीमारेखा

सनईच्या सुरांना
धांगडधिंगेची चाल लागलेली ऐकताना
कोठेतरी थरारतात इतिहासाची पानेही.

रणभेरीतून बाहेर पडणाऱ्या निनादांनी
जेव्हा कंपीत होतात आपल्या भिंती
तेव्हा ती नांदी असते आपल्या पराजयाची.

आकांताने टाहो फोडणाऱ्या विधवेचं
किंवा शिल्लक राहिलेल्या एखाद्या निष्पाप बालकाचं ओझं नाकारून
सांत्वनपर शब्दांच्या दर्भावर तर्पणाचे पाणी सोडून
वर्तमानाला निर्विकारपणे टाळून
जेव्हा चालू लागतात आपलेच सगे, सोयरे, बंधू
तेव्हा इतिहासालाही ओरबडून काढावीशी वाटते
स्वतःची ललाटरेखा जाणीवपूर्वक.

पुसत चाललेल्या नात्यांच्या सीमारेखा
आता तरी अधोरेखित व्हाव्यात-
अनाम भविष्याने काही निर्णयाप्रत येण्याआधी!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## रानफूल

मला माहित आहे
पालवी फुटणारच
चैत्र नाही आला तरी
निमित्त ऋतुंचे, केवळ एक प्रघात.

फाल्गुनाची आग सहन न होवून
रानही उठते पेटून
मुक्या वणव्याच्या आक्रोशाने
जाळून घेत स्वतःला
आणि जन्मतो तेथेच अन्यायाविरुद्धचा पहिला लढा.

महापूरे झाडे जातीचा लुच्चा पाठ
लव्हाळांना लखलाभ!
त्यापेक्षा शतधन्य रानगवताची राख
आणि त्यातून जन्मणारे
रानफूल!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# विरह

असं नाही की तू मला विसरलीस
अगर मी तुला.
असं नाही की तू माझ्यासाठी जन्माला आली नव्हती
की मी तुझ्या.
मी असंही म्हणणार नाही, की तू पाळली नाही दिलेली वचने
आणि मी देखील.
हे सारं खरं आहे.
मला माहीत आहे हे आणि तुलाही.
आपण दूर झालो
म्हणून दुरावलो असं नाही.
आपण एकत्र आलो होतो ते परस्परांना सुखी करण्यासाठी!
आणि दुरावलो ते देखील तेवढ्याचसाठी.
तू मनं सांधलीस, तसा मी देखील नव्हतो संधीसाधू.
आज इतक्या वर्षांनी आपण भेटलो.
बोललो मोकळेपणाने सर्वांसमक्ष
कारण गरज नव्हती तुला लपवण्याचे तुझे तोंड
अगर मलाही.
मी सलाम केला तुला, तुझ्या मुलांना
आणि कुटुंबाला.
त्यापैकीच कुणी ज्येष्ठाने दिलेत आशीर्वाद तोंडभरून
त्यातच आले आपले खरे प्रेम
आणि त्याचे अमरत्वही!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अस्तित्त्व

थुंकीबरोबर
भाकरी गिळणाऱ्यांची भांडीही असतात मातीची
इथे चांदीच्या भांड्यातूनही आपण
सूर्याचे अस्तित्व विसरून
बंद दरवाजाच्या फटीतून
विश्व दर्शनाचा छंद जोपासतो.

सहकाराच्या तत्वावर-
आपण सारेच जुळवत असतो सूर
'चित्रहाराच्या' स्वरात, कोंडलेल्या श्वासांचा आवंढा गिळत.
आणि फोफावत असतात मनीप्लँट
बाटल्या बाटल्यांमधून प्रत्येक फ्लॅटात
मातीतून उठणाऱ्या रोपांनी माना टाकल्यावर!

नळाच्या तोटीतून
झिरपणाऱ्या निर्झर पाण्यावर-
पोसले जात असतात रंगीबेरंगी मासे
काचेच्या लिकप्रूफ चौकोनातून, आपल्याच सोबत
भिंतीवरील मांजरांच्या पोएट्रेटची नजर चुकवून.
आणि विसरतो आपण-
मातीच्या भांड्यातील भाकरीची चव.
कळत नाही हा कोठला अंधार जपून आहेत डोळे.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## इशारा

या दग्ध काळजांचा हा तळपता निखारा
शब्दास आग आहे, हा अखेरचा इशारा.

या पेटल्या मशाली, आमच्या मना मनांच्या
उद्‌ध्वस्त जीवनांचा हा पाहता पसारा.

मस्तीत जरीही आहे तुमचाच खेळ सारा
ना वेळ अजुनि गेली, आता तरी सुधारा.

बलदंड या भुजांची, तुम्हास आण आहे
ओसाड कपाळांची संख्या तरी विचारा.

तुम्हास आण आहे, त्या चिमुकल्या जीवांची
गेलेत आईबाप, ना आप्त ना निवारा.

शिजवून या कटांना, केलेत काय तुम्ही?
आपुल्याच उरातल्या वाहतात रक्तधारा.

टाका पुसून आता इतिहास हाच काळा
जयचंद, राघोबांचा मांडू नका पसारा.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## सवाष्ण

खुशाल खुडला कर्दळीचा गेंद
ओंजळीत पडले दवाचे थेंब
ओठ भिजले थेंबाने
सुखं आली रंगाने.

पिवळा पिवळा हिरवा लाल
भांगावरती पहाट गुलाल
भांग भरल्या मोत्याची
भाव भरल्या रंगाची.

रंग रंग हळदीचा
ओल ओल्या कर्दळीचा
कर्दळीचा गंध गोड
पैंजणांची त्याला जोड.

जोड अशी हिरवीगार
हळद कुंकू पाणीदार
पाण्यात भिजत रुजत गेली
कर्दळीही सवाष्ण झाली.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## पतन

‘एकदा भोगावरच घाव घातला
म्हणजे पतन उरत नाही!’
म्हणता स्वामीजी आपण
पण-
हेही होवू द्या जरा स्पष्ट, की
‘भोगच नाही तर दगड आणि माणूस
यातील फरक तो कोणता?’



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## वेध

मन खूप तडफडते, तळमळते
व दुःखाने वेदना असह्य होतात
तेव्हा वाटते-
अंधार व्हावा सर्वदूर
इतका कच्च अंधार
कि आपणही दिसू नये आपल्याला
आणि कोंडून घ्यावं स्वतःला त्या अंधारात
पण तिथेही-
या जळणाऱ्या मनाचा प्रकाश लपवायचा तो कोठे?
ही धगधग, ही तडफड
शोध अंधाराचा कि वेध प्रकाशाचा?



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## जोगवा

जिंदगी बर्बाद माझी, इतके कटू ना आयुष्यही
क्षणा दो क्षणाचे दुःख आहे, आणि सुखाची वाट ही

लाथेत म्हणा जिंदगी, बर्बादीची नाही तमा
का फुका गोंजारू, दिवस आजचा मज नवा

काल रात्री रात्र होती, आज सूर्य तळपतो
नव्हे अंधार यात्रीच मी, भविष्यास गोंजारतो.

काळ गेला, काळ आला, काळे तोंड त्याचे असे
शोधत काळोख फिरणे, घुबडासम जिणे माझे नसे.

मी सजवितो मैफिली, भैरवीचा तो सूर नाही
मारवा खुशीत अपुल्या, खुणावते तेज दृष्टीलाही.

मी जगावे वा मरावे, काय त्याचे घेणे जगा
सहस्त्रसूर्य ज्याचे मनी, करी जन त्याचीच वाहवा.

थुंकून टाका अंधार यात्री, काळोख कोंडलेला मनाचा
तेज देहात तुमच्या, का फुका रात्रीचा जोगवा.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# दिवा

झोकून दिले स्वतःला वाऱ्याच्या झोतावर,
आणि उनाडपणाची सारी विशेषणे विषण्ण मनाने सोसलीत
अटळ अलिखित म्हणून
सूर्याचा प्रत्येक किरण वाकुल्या दाखवून विचारत होता
हिशेब प्रत्येक श्वासाचा, आणि निःश्वासागणिक विझत जायचा
प्रत्येक दीप प्रकाशाचा.
सूर्य माझ्याच बापाचा म्हणून खिशात घेवून फिरणारेही
अंधारयात्रीच आहेत, असे कोठलेच सत्यही
मान्य नव्हते सूर्याच्या पिल्लांना.
आता सूर्यवंशाचे सत्य वेशीवर टांगण्याशिवाय पर्याय नव्हता
मनातील तळघरात कोठून आणाल सूर्य?
तेथे तेवतो माझा दिवा
दाखविण्याशिवाय पर्याय नव्हता



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## काव्यप्रभा

पावलोपावली वेदनांचे खच पडलेले असतानाही
मला अढळ पाहून तूच दाखवलेस मला नवीन जीवन. नाही?
तुझ्याच शिकवण्यातून शिकलो मी तडजोड
पण स्वीकारू शकलो नाही पूर्णपणे हेही काही नवीन नाही तुला.
तू मनकवडी- मनातलं जाणून घेतेस नेहमी
बोलघेवडी- बोलता बोलता बनवणारी
तू अबोल- अबोलीच्या फुलासारखी
तू ज्वालामुखी, नखःज्वालाही
कोणती आभूषणे लावावीत गं तुला?
काहीच कळेनासं होतं बघ!
तू नग्न, तू भग्न, तू हताश, तू निराश
तू आकार, तू निराकार
मद्याच्या ग्लासातली मदिराही तूच.
मंदिरातल्या कृष्णाची बासरीही तूच.
मुक्या फुलातून बोलतेस कधी
धरतीचे काळीज फाडतेस कधी
गाईचा हंबरडाही तूच
झाडे, वेली, फुले, पक्षीही तूच.
कोण नाहीस तू?
होय, हे सर्व काही आहेस तू
तुझ्याच शब्दात सांगायचे तर
तू म्हणतेस मी थांबलेय तुझ्यासाठी
आणि चालायला लावतेस मला!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## कविता

तू चिरतरुण!
कधी कल्पना केली नव्हती मी
असावे तुझ्यात सौंदर्याचं मूर्तीमंत रूप
माझं तुझ्यात रमणमाण होण्यासाठी तेवढे एक कारण
नव्हता घेतला कधी मी शोध तुझा त्या दृष्टीने
तू समोर आलीस, मला आवडत गेलीस
मी न्हावून निघत होतो तुझ्यात शब्दाशब्दागणिक
तेव्हा तू होतीस शांत, स्तब्ध, निरागस.
कधी घुसमळून टाकले, कधी घुसमटून.
मी ही थोडासा बावरलेला.
नव्हता तेव्हा विचार तू कल्पित की सत्य
कधी अर्थापलिकडे गेलीस, कधी अर्थहीन, कधी दुर्बोध
कधी उत्शृंखल, कधी खट्याळ, कधी हट्टी
मी पाहिलीत तुझी सर्व रूपे.
आतूर- दर्शनासाठी माझ्या मीरा होवून
आसक्त- रमणमाण झालीस माझ्यातच कधी
अलिप्त- कुठेच नसल्यासारखीही राहिलीस कधी
ही सारी रुपे तुझीच ना गं?
मी समजू शकलो नाहीच तुला कधी
असं तूच म्हणालीस ना?
नाही समजून घेणार कधी,
असंही कधी म्हणाली होतीस का?
असेलही कदाचित खरं.
पण अतिरेक, अविचार कधी रुजला नाही मला
नाही विकले कधी इमान, ना स्वतःलाही!

■



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आजी - एक आत्मिय अपरिहार्यता

*(माझ्या आजीला आम्ही सारे 'आई' म्हणत असू व वडिलांना 'अप्पा')*

❍ आई, तुझ्याजवळ बरेच काही होते.
माझ्या दिवसाची सुरूवात
तुझ्या कंठातील मधूर भूपाळीने होत असे.
तुझे व्यवहारज्ञान, सूज्ञता, समंजसपणा, समाजकारण
आयुर्वेदाचे ज्ञान, सर्वसमावेशकता
खूप काही होते तुझ्याजवळ
आई, यातील निम्मे तरी यावे का माझ्या वाटणीला?

❍ आई तुझ्या एका भूपाळीत-
'सूर्यवंशी वंशावळी राजे झाले भूमंडळी
स्मरा त्यांची नामावळी उदय काळी भानूच्या'
अशी संपूर्ण सूर्यवंशाची वंशावळ
भल्या पहाटे कानावर येत असे.
आताच्या 'गुगल'मध्ये जाणवेल कां गं त्याचा जिवंतपणा?
आता तर सर्व सुखसोयींनीयुक्त आम्ही
दुपारी दोन वाजता ऐकत असतो-
'ऊठी ऊठी गोपाला...'
किती सुसंस्कृत आहोत गं आम्ही!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

○ आई, भगवद्‌गीता अप्पा नेहमी वाचत.
बऱ्याच वेळा त्यातील श्लोकांचा त्यांनी सांगितलेला
अर्थ माझ्या बुद्धीला पटत नसे.
त्यापैकीच 'सर्वसंग परित्यज्य'चा अर्थ तू
सांगितला होता की,
सर्वसंग परित्यज्य यात गीताही आली
त्यातही अडकून राहू नकोस!
तुझ्या पद्धतीने योग्य मार्गाने चालत रहा
आणि तुझ्याच आत्म्याला शरणागत रहा!
आई, इतक्या सोप्या भाषेत जीवनाचा अन्वयार्थ
तत्वार्थ दीपिकेतही नाही गं!
म्हणून वाटते प्रत्येक नातवाला एक आजी असावी.

○ आई, आप्पा सांगत असत-
त्यांच्या लहानपणी त्यांची आजी
साजूक तुपातली गरम-गरम गुळाची जिलेबी
रोज सकाळी भरवत असे त्यांना.
आई, सर्व मुलांची आजी अशीच असते का गं?
निःस्वार्थी प्रेम हा तिचा स्थायीभाव असावा अशी.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

- आई, मी तुझ्या खूप गोष्टी सांगतो माझ्या मुलांना.
त्या ऐकून ते विचारतात-
बाबा, इतकी सुंदर खरेच असते का हो आजी, एखाद्या परिकथेसारखी?
मी अनुत्तरीत.
मलाही भास होतो स्वप्नातल्या गोष्टी सांगत असल्याचा.
खरेच, किती भाग्यवान आहे मी.

- आई, माझ्या लहानपणी
तू रोज संध्याकाळी गल्लीभर फिरत असे माझ्यामागे-
मला मारण्यासाठी काठी हातात घेऊन.
आणि त्याच काठीने मारही देत असे कधी-कधी.
माझ्या खोड्यांमुळे.
तुझा मार आठवूनही तुझा राग का गं येत नाही मला?
संस्कार रुजवण्यात हातखंडाच होता म्हणा तुझा! एवढेच खरे.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

❍ आई, तुझे माझ्यावर प्रेम करणे, रागावणे
आणि मार देणेही नित्याचेच होते बघ!
अगदी माझ्या विशीनंतरही.
आता मुलांना मार देणे तर दूरच
रागावणेही अवघड झालेय बघ.
ती अकालीच मोठी झाली असावी कदाचित.
मडके पक्के होण्यासाठी भाजावे लागते हे कोण सांगेल गं त्यांना आता?

❍ आई, तू मारायचीस, म्हणून मी थोडा तरी झालो समंजस
आज माझ्या मुलांसोबत त्यांची आजी नसल्याने
आम्ही खर्ची घालतो आमचे आयुष्य
मुलांच्या संवेदना जपण्यात.
नकळत खतपाणीही देतो त्यांना.
एवढे करूनही त्याच्या संवेदना अधिकच टोकदार होतात.
आणि संकटं समोर येताच-
ते घेतात टोकाच्या भूमिका!
म्हणून तरी वाटते.
आजी असावी प्रत्येक घरात,
दोन पिढ्यांचे अंतर जोखून त्यांना व्यवस्थित सांभाळणारी!



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

- आई, तू मालकीण होतीस घराची!
  पै-पैका, सोने-नाणे सर्व तुझ्या ताब्यात असायचे.
  पण नाही दाखवला तू कधी त्यावर तुझा मालकी हक्क.
  अगर तुला हव्यासही नव्हता कधी त्या सर्वांचा.
  आताशा मी आणि माझे याचाच आम्हाला हव्यास असतो बघ.
  खरेच इतके आत्मकेंद्रित झालो आहोत का गं आम्ही?

- आई, मी बारा-तेरा वर्षांचा असतांना
  चांदीच्या काठांचा तुझा भरजरी शालू जाळून घेतलास तू माझ्याकडून
  आणि त्यातील चांदी काढून घेतलीस तू.
  आता खूप दुःख होते मला
  चांदीच्या मोहाला बळी पडून अनमोल ठेवा गमावल्याचे!
  पण तरीही वाटते-
  बरे झाले!
  नाहक त्याचा मोह झाला असता मला.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

○ आई, तुझ्यात ताकद होती
प्रत्येक वादळ शमवण्याची.
वाटते-
आजीशिवाय घर म्हणजे-
नुसते वादळ आणि वादळ.
दिशा बदलून टाकणारं, आयुष्याच्या!

○ आई, तुझा देहांत झाला तेव्हा-
सारे बसतात तसा मी देखील बसलो
तुझ्या निष्प्राण देहाशेजारी.
साऱ्यांच्या डोळ्यात अश्रू होते.
पण माझ्या डोळ्यात एक टिपूसही येत नव्हता पाण्याचा.
आई, मी प्रेम करुच शकणार नाही काय गं कुणावर?



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

❍ आई, मी खूप मंदिरे पाहिली.
माथाही टेकविला असेन कित्येकदा.
तू निघून गेल्यापासून मी तसाच शरणागत आहे
शोधतोय चरण
नतमस्तक होण्यासाठी.




e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मानिनी

पापण्यांच्या कडांस दोन्ही, लाभो सदैव तव ओलावा
अत्यानंदाच्या क्षणीही आणिक, सहवास मज तुझाच हवा.
नको संपदा आणिक पैका, धनधान्याची रास नको
एक परि दो सांजची भाकर, आणिक शांती घरात वसो.
नकोत गाद्या अन् गालिचे, राजमहलही मला नको
हे सुखस्वप्नी राहो माझ्या, कष्टाचाच मज घास असो.
नसल्या साड्या, आणिक गाड्या, खंत मनी ती कधी नसो
एकच केवळ कठीण प्रसंगी, साथ मज तुझीच असो
काय देऊनि देतील सगळे, घेणाऱ्याला लाज असो
तुझ्याच मनी ही मानिनीची, ज्योत सदैव प्रज्वलित असो.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



“सूर्याचे काळीज दाखविणारी ही लखलखती कविता केवळ उमगतच जात नाही तर ती एक विशाल असा दृष्टीकोनही वाचकाला बहाल करते. कारण या कवितेला एक दमदार अशी नैतिकता आहे. तिला वास्तवतेविषयी कमालीची आस्था आणि जिव्हाळा आहे. आजुबाजूच्या कोलाहल आणि त्याची तीव्रता स्वीकारून ही कविता संयतपणे अभिव्यक्त होत राहते.”

– विवेक उगलमुगले, नाशिक

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

कवी सुहास बाविसकर यांच्या कविता आपल्याला कशा वाटल्या? कृपया आपला अभिप्राय नोंदवा. एखाद्या तरूण नवकवीसाठी आपला एक अभिप्राय त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरू शकतो.

इंटरनेट आणि मोबाईल आता घरोघरी पोहचत आहे. गांवोगावी, खेडोपाडीसुद्धा. त्याचे काही तोटे असतील. पण खूप सारे फ़ायदेही आहेत. मराठी भाषेला नवीन जोम देण्यासाठी या माध्यमाचा एक टॉनिक म्हणून उपयोग होऊ शकतो. मराठी भाषेचा अंगभूत गोडवा आणि जोर यांना किंचित पुशची गरज आहे. थोड्याशा प्रमोशनची. तेच काम या पिढीतील अनेक संस्था करत आहेत. त्यातलीच एक ई साहित्य प्रतिष्ठान. ग्रामीण भागातील टॅलंटेड कवी लेखकांना जागतिक प्लॅटफ़ॉर्म मिळवून देण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठान करत असतं.

या संस्थांना आपण मदत करू शकता. ही पुस्तकं जास्तीत जास्त लोकांपर्यंत न्या. त्यांचे मेल आय डी आम्हाला कळवा. आपण सर्वजण मिळून एक भव्य व्यासपीठ बनवू.

आपल्या दहा किंवा अधिक साक्षर नातेवाईकांचे किंवा मित्रांचे मेल आय डी द्या आणि ई साहित्य चे VIP सदस्य बना.

आमचा पत्ता : esahity@gmail.com